352

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

## जुलै- २०१६ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावयाच्या तारखांबाबत...

## प्र क ट न

राज्य शासनाचे आदेशानुसार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत नियमित, पुनर्परीक्षार्थी, व नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजने अंतर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ट होणाऱ्या द्यार्थ्यांसाठी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा सप्टेंबर-ऑक्टोबर २०१६ ऐवजी जुलै-२०१६ मध्ये आयोजीत ण्यात आलेली आहे. त्यासाठी सदर परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने **www.mahahsscboard.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा खालीलप्रमाणे-

| शुल्क प्रकार | विद्यार्थ्यांनी उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| नियमित शुल्क | सोमवार, दिनांक ३०/०५/२०१६ ते गुरूवार, दिनांक ०९/०६/२०१६ | शुक्रवार, दिनांक १०/०६/२०१६ ते मंगळवार, दिनांक १४/०६/२०१६ | शुक्रवार, दिनांक १७/०६/२०१६ |
| विलंब शुल्क | शुक्रवार, दिनांक १०/०६/२०१६ ते सोमवार, दिनांक १३/०६/२०१६ | बुधवार, दिनांक १५/०६/२०१६ ते गुरूवार, दिनांक १६/०६/२०१६ | |

सदर परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत भरावी. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील बाबी लक्षात घ्याव्यात.

१. श्रेणीसुधार करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जुलै २०१६ व फेब्रुवारी-मार्च २०१७ अशा दोन संधी उपलब्ध राहतील.

२. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन भरलेल्या (Upload केलेल्या) आवेदनपत्रांच्या प्रिंटेड प्रती वर दिलेल्या तारखांप्रमाणे तसेच प्रचलित पध्दतीप्रमाणे बँक ऑफ इंडियामध्ये चलनाद्वारे शुल्क भरून चलनाची प्रत विभागीय मंडळाकडे जमा करावी.

३. ऑनलाईन आवेदनपत्र भरतांना फेब्रुवारी-मार्च २०१६ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची या परीक्षेतील माहिती आवेदनपत्रात ऑनलाईन घेता येईल.

४. नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावे.

५. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा सप्टेंबर-ऑक्टोबर २०१६ मध्ये घेतली जाणार नाही याची विद्यार्थी, पालक, मुख्याध्यापक व सर्व संबंधित यांनी नोंद घ्यावी.

६. आवेदनपत्राची प्रिलिस्ट दिली जाणार नाही. त्यामुळे आवेदनपत्रे अचूक भरण्यात यावी.

~~७. आवेदनपत्रे भरावयाच्या तारखांमध्ये कोणतीही मुदतवाढ~~ देण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

-स्वाक्षरीत-
(कृष्णकुमार पाटील)
सचिव.

क्र.पुविमं/उ.मा.अ/परीक्षा/352 दिनांक २७/५/२०१६

प्रति,

प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविदयालय
पुणे/अहमदनगर /सोलापूर

उपरोक्त राज्य मंडळाच्या प्रकटनानुसार आपल्या कनिष्ठ महाविदयालयातील सर्व संबंधित शिक्षक,विद्यार्थी यांच्या निदर्शनास सदर बाब आणून दयावी व आवेदनपत्रे भरण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच आवेदनपत्र भरल्यानंतर शुल्काचे चलन आणि विद्यार्थ्यांच्या याद्या दि.१७/०६/२०१६ रोजी पुणे विभागीय मंडळ कार्यालयात जमा करण्यात यावे.

विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-411 005